

राष्ट्रवादी
काँग्रेस पार्टी

# जनतेच्या हितासाठी
# प्रत्येक पाऊल
# प्रगतीसाठी



## दत्तात्रय इंदुबाई बबनराव धनकवडे

मा. महापौर व नगरसेवक पुणे म. न. पा.
सरचिटणीस, महाराष्ट्र राज्य रा. काँ. पार्टी

**प्रभाग क्रमांक ३८,** बालाजीनगर आंबेगाव कात्रज

**कार्यावलोकन... (२००७–२०२५)**



छत्रपती शिवाजी महाराज | महात्मा बसवेश्वर महाराज | राजश्री शाहू महाराज | डॉ. बाबासाहेब आंबेडकर | मौलाना अबुल कलम आझाद | लोकमान्य टिळक | महात्मा ज्योतिबा फुले | सावित्रीबाई फुले | आण्णाभाऊ साठे

# मनोगत

## सस्नेह नमस्कार

### जिथं लोकविश्वास ठाम असतो...

तिथेच सर्वांगीण उत्कर्ष आणि प्रभागाचं उज्वल भविष्य घडू शकतं,
त्यातूनच ठोस विकास घडू शकतो.
ज्यासाठी आम्ही नेहमीच प्रथम प्रभाग व परिसरातील संपूर्ण गरजा जाणून घेतल्या व त्यातून समाज मन जाणले आणि नेहमीच सर्वसामान्यांना प्राधान्य देऊन विधायक समाजकारण केले.ज्या समाजकारणातून

**आदरणीय शरदचंद्र पवार साहेब,**
**उपमुख्यमंत्री मा. अजितदादा पवार**

यांच्या मार्गदर्शनातून आपल्या या पुण्यनगरीतील सुज्ञ व सुजाण नागरिकांचा प्रथम नागरिक म्हणून मी महापौर पदही भूषविले.
आपला हा उदंड लोकविश्वास आणि अखंड लोकसहवासामुळेच मला हे सारे शक्य झाले आहे. याच जाणीवेतून माझ्या या गेल्या पंधरा वर्षांत पुढील पंचवीस ते तीस वर्षांच्या ठळक विकासकामांचा हा आढावा माझ्या कौटुंबिक प्रभागवासियांसाठी.

आपला नम्र
दत्तात्रय इंदुबाई बबनराव धनकवडे


जनतेच्या
हितासाठी
प्रत्येक पाऊल
प्रगतीसाठी




# लोकमत वृत्त समूहाकडून सन्मान...

राजकिय, सामजिक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्यांची दखल घेत लोकमत वृत्त समूहाने मला २०२२ चा "लोकमत अॅचीवर्स ऑफ पुणे" पुरस्काराने सन्मानित केले. हा पुरस्कार तत्कालीन वन राज्यमंत्री मा.श्री. दत्तामामा भरणे, मा. महापौर श्री. मुरलीधर मोहोळ, सिनेअभिनेता श्री.स्वप्निल जोशी व लोकमतचे संपादक श्री. संजय जी आवटे यांच्या हस्ते मिळाला. हा सन्मान माझा नसून माझे हितचिंतक, सहकारी मित्र, माझ्यावर विश्वास टाकणाऱ्या माझ्या प्रभागातील मतदार बंधू भगिनी आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या कार्यकर्त्यांचा आहे. या यथोचित सन्मानाबद्दल दैनिक लोकमतचे मनापासून आभार.

जनतेच्या हितासाठी
प्रत्येक पाऊल प्रगतीसाठी







आपल्या पुण्यातील जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन यांच्या माध्यमातून राजकीय क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल गौरव पुरस्कार सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला. सामाजिक आणि राजकीय जीवनात मिळालेले पुरस्कार अधिक ताकदीने सेवाकार्य करण्यासाठी प्रेरित करतात. मला हा पुरस्कार दिल्याबद्दल जाधवर ग्रुपचे मनापासून आभार.


# दक्षिण पुणे झाले गतिमान

## सद्‌गुरू श्री. शंकर महाराज उड्डाणपूलाचा दैदिप्यमान शुभांरभ...

आपल्या महत्वाकांक्षी कल्पनेतल्या आणि प्रभागातील पुणे-सातारा रस्त्यावरील सद्‌गुरू श्री. शंकर महाराज उड्डाणपूलाचे लोकार्पण राज्याचे उपमुख्यमंत्री मा.श्री. अजितदादा पवार यांच्या हस्ते पार पडले आणि दक्षिण पुण्यातील बालाजीनगर-धनकवडी-आंबेगाव-कात्रज भागातील नागरिकांनी रोजच्या वाहतुक कोंडीतून सुटकेचा निश्वास सोडला.

अनेक वर्षांपासून या परिसराची वाहतुकीची समस्या असलेल्या प्रमुख पुणे-सातारा रस्त्यावर विस्तृत अशा उड्डाणपूलाची गरज अक्षरशः जीवनावश्यक बनली होती. त्याला कारणीभूत होते झपाट्याने वाढणाऱ्या पुण्याच्या विस्तारीकरणातील अपुरे रस्ते. परिणामी याच ठिकाणी अपघातात अनेकांनी आपले जीव गमावले होते. इथल्या वर्दळीमुळे या भागातला विकासही मंदावला होता. याच जाणीवा उणीवातून या विस्तृत उड्डाणपूलाच्या रुपाने विकासकामांना आणि बालाजीनगर-धनकवडी-आंबेगाव-कात्रज भागातील नागरिकांच्या संपूर्ण जीवन शैलीलाच गती मिळवून दिली. तसेच वाहतुकीची जटील समस्या कायमस्वरूपी सोडवली.





उड्डाणपूल सुरु होण्यापूर्वीचा सातारा रस्ता



सद्‌गुरू श्री. शंकर महाराज उड्डाणपूल







सद्‌गुरु श्री. शंकर महाराज उड्डाणपुलास
एल.ई.डी. लाईट ईफेक्ट देऊन सुशोभीकरण केले.



सद्‌गुरु श्री शंकर महाराज उड्डाणपुलाचे लोकार्पण करताना
मा. अजितदादा पवार यांच्यासमवेत


# दक्षिण पुणे झाले गतिमान

दक्षिण पुण्यातील कात्रज चौकामधील समस्या सोडवण्याच्या दृष्टीने कात्रज चौक येथे उड्डाणपुल अथवा ग्रेड सप्रेटर उभारण्याबाबत २५ ऑगस्ट २०१७ रोजी **केंद्रीय रस्ते, महामार्ग मंत्री मा. नितिन गडकरी साहेब व आदरणीय श्री. शरदचंद्र पवार साहेब** यांना निवेदन देऊन मागणी केली होती. त्या मागणीला यश आले आणि कात्रज उड्डाणपुलाचे काम सुरू झाले असून नुकतीच **उपमुख्यमंत्री अजितदादा पवार** यांच्यासमवेत उड्डाणपुलाच्या कामाची पाहणी केली. कात्रज उड्डाणपुलामुळे कात्रज परिसरातील वाहतुकीची समस्या कायमस्वरूपी सुटणार आहे.





उड्डाणपुलाच्या मागणीसंदर्भात आदरणीय शरदचंद्र पवार साहेब आणि केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री मा. नितिन गडकरी साहेब यांना निवेदन देताना



दत्तात्रय धनकवडे

मा. महापौर, पुणे

दिनांक: / /२०
दि. २५/०८/२०१७

प्रति,
मा. ना. नितीनजी गडकरी साहेब
मंत्री, रस्ते, महामार्ग व जहाज वाहतूक,
भारत सरकार.

यांस.....

विषय :– पुणे–सातारा रस्त्यावर कात्रज चौक येथे उड्डाणपुल/ग्रेड सेप्रेटर उभारणे बाबत.

महोदय,

पुणे शहरामधुन जाणाऱ्या महामार्गाबाबत दिल्ली येथे महाराष्ट्र भवनामध्ये ९ सप्टेंबर २०१५ रोजी आपल्या अध्यक्षतेखाली व मा. ना. प्रकाश जावडेकर सो, मा. पालकमंत्री गिरीषजी बापट सो, मा. शरदराव पवार सो, मा. अजितदादा पवार सो. व सर्व खासदार आणि आमदारांच्या उपस्थितीत बैठक झाली होती. त्यामध्ये चांदणीचौक, कात्रज चौक, सुस रस्ता, येथील उड्डाणपुलांची कामे NHAI मार्फत करण्याचे ठरले व तसे आदेश आपण आपल्या खात्यातील अधिकाऱ्यांना दिले.

त्यानंतर या बाबतचे सर्व डिझाईन व इस्टीमेंटस् पुणे महानगरपालिकेने NHAI ला सादर केलेले आहेत. त्यामधील चांदणी चौक येथील उड्डाणपुलास मान्यता झाली परंतु कात्रज येथील उड्डाणपुल /ग्रेड सेप्रेटर त्याला अजुन मान्यता मिळालेली नाही. सदर ठिकाणी उड्डाणपुल /ग्रेड सेप्रेटर होणे अत्यंत गरजेचे आहे. मोठया प्रमाणात वाहतुक कोंडी होत आहे. तरी आपण याबाबत योग्य तो निर्णय घ्यावा, हि विनंती.

कळावे,

आपला स्नेहांकित

श्री. दत्तात्रय धनकवडे
मा. महापौर, पुणे.
सभासद, पुणे म.न.पा

निवेदन पत्र








कात्रज उड्डाणपुलाच्या विकासकामाची पाहणी करताना मा. अजितदादा पवार यांच्यासमवेत

# जन आरोग्य हितार्थ नेहमीच कटिबद्ध

दक्षिण पुण्यातील जनतेच्या आरोग्यविषयक समस्या सोडवण्यासाठी बालाजीनगर येथे सुसज्ज असे कै. काशिनाथ आनाजी धनकवडे पाटील प्राथमिक आरोग्य केंद्र व प्रसुतीगृह उभारले. या प्राथमिक आरोग्य केंद्र व प्रसुतीगृहाचे लोकार्पण २७ डिसेंबर २०१६ रोजी मा. अजितदादा पवार यांच्या हस्ते झाले. या हॉस्पिटलचा आणि प्रसुतीगृहाचा लाभ दक्षिण पुण्यातील बालाजीनगर-धनकवडी-आंबेगाव-कात्रज परिसरातील नागरिकांना व महिला भगिनींना मोठ्या प्रमाणात होत आहे.

## आजपर्यंत आरोग्य सुविधांचा लाभ घेतलेल्या नागरिकांची आकडेवारी

- ओपीडी = १,९२,५२३
- लहान बाळांची लसीकरण = १०,३१३
- सोनोग्राफी = ३,८२०
- प्रसूती = २,२१५



काशिनाथ आनाजी धनकवडे पाटील प्राथमिक आरोग्य केंद्र व प्रसुतीगृहाचे लोकार्पण करताना मा. अजितदादा पवार यांच्यासमवेत



गरोदर महिलांच्या तपासणीसाठी सोनोग्राफी मशीन

**जनतेच्या हितासाठी**
**प्रत्येक पाऊल प्रगतीसाठी**








ऑपरेशन थिएटर



आद्यावत प्रसूती गृहाची पाहणी करताना



वातानुकुलीत व अद्यावत जनरल वार्ड

# जन आरोग्य हितार्थ नेहमीच कटिबद्ध

दक्षिण पुण्यातील नागरिकांचे आरोग्य निरोगी राहण्यासाठी आणि त्यांना शासकीय दरात औषध उपचार उपलब्ध होण्यासाठी २०१७ च्या निवडणुकीत प्रभागात नव्याने समाविष्ट झालेल्या अप्पर बस डेपो, राजीव गांधी नगर येथे ६० बेडचे स्व. माणिकचंद नारायणदास दुगड मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलची उभारणी केली. या हॉस्पिटलचे लोकार्पण १३ मार्च २०२२ रोजी मा.श्री. अजितदादा पवार यांच्या हस्ते पार पडले.
या मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये ओपीडी, आयपीडी, अतिदक्षता विभाग (ICU), अद्यावत लॅब, अद्यावत ऑपरेशन थिएटर , आर्थोस्कोपी, डायलिसिस, इंडोस्कोपी, स्त्री-रोग तज्ञ विभाग, प्लास्टिक सर्जरी, डायटीशन, हृदयरोगतज्ञ विभागासह अन्य सुविधा शासकीय दरात मिळत आहे. दक्षिण पुण्यातील राजीव गांधी नगर, सुखसागर नगर, बिबवेवाडी, बालाजीनगर, आंबेगाव, कात्रज, गुजरवाडी व इतर परिसरातील नागरिक मोठ्या प्रमाणात या सुविधांचा लाभ घेताना दिसत आहेत.

## आजपर्यंत आरोग्य सुविधांचा लाभ घेतलेल्या नागरिकांची आकडेवारी

- ओपीडी = ६,२८४
- आयपीडी = ३३८
- आयसीयू = १५३
- लॅब तपासणी = ६,५५३
- विविध यशस्वी शस्त्रक्रिया = ६३



हॉस्पिटलचे लोकार्पण करताना
मा. अजितदादा पवार यांच्यासमवेत



जनरल वार्ड

**जनतेच्या हितासाठी**
**प्रत्येक पाऊल प्रगतीसाठी**






ICU



ऑपरेशन थिएटर





पूर्वी पाण्यासाठी तासंतास रांगेत उभे असणाऱ्या भगिनी





घराघरात नळ कनेक्शन
देऊन मुबलक पाणी दिले.




# रोजचे जगणे झाले सुसह्य घरोघरी पोहचले पाणी

दक्षिण पुण्यातील अनेक वर्षांपासून असणारा पाणी प्रश्न सोडवण्यासाठी २००७ साली बालाजीनगर येथील श्रीहरी सोसायटीमध्ये १० लाख लिटर क्षमतेची पाण्याची टाकी उभारणी केली. कात्रज पंपिंग स्टेशनमधील ४५ एचपी पंप बदलून १२५ एचपी उच्च दाबाचा पंप बसवला. तसेच परिसरातील उंच इमारतीच्या शेवटच्या मजल्यापर्यंत पाणी पोहचवण्यासाठी पाण्याच्या जुन्या पाईपलाईन बदलून ६ इंची आणि ८ इंची मोठ्या व्यासाच्या पाईपलाईन टाकल्या. तसेच प्रत्येक घरात नळ कनेक्शन दिले. यामुळे नागरिकांना उंच इमारतीमधील शेवटच्या मजल्यापर्यंत म्हणजेच सहाव्या मजल्यापर्यंत उच्च दाबाने व वेळेवर पाणी मिळू लागले आणि नागरिकांच्या दृष्टीने असणारा पाणी कायमस्वरूपी सोडवला.



१२५ उच्च दाबाच्या पंपाचे उद्घाटन करताना



राजीव गांधी नगर येथील पाण्याची टाकी.

# रोजचे जगणे झाले सुसह्य घरोघरी पोहचले पाणी

२०१७ च्या निवडणुकीत प्रभागात नव्याने समाविष्ट झालेला राजीव गांधी नगर, बिबवेवाडी या भागात ४५ लाख लिटर क्षमतेच्या पाण्याच्या टाकीची उभारणी केली. या टाकीमुळे सुखसागर नगर, बिबवेवाडी परिसर, राजीव गांधी नगर, अप्पर इंदिरानगर परिसरातील नागरिकांना सुलभ, नियमित आणि उच्च दाबाने पाणीपुरवठा होणार असून प्रभागात नव्याने समाविष्ट झालेल्या भागाचा पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सुटणार आहे.

जनतेच्या हितासाठी
प्रत्येक पाऊल प्रगतीसाठी





वंडरसिटी येथील पाणी टाकी तसेच पंपिंग स्टेशनच्या कामाची पाहणी
करताना उपमुख्यमंत्री मा. अजितदादा पवार यांच्यासमवेत

# वीज तारांचा गुंता भूमिगत झाला नागरिकांच्या जीवाचा धोका टळला

जुन्या विकास रचनेनुसार वर्षानुवर्षे वीज तारांचा गुंता आणि अडचणीच्या खांबांमध्ये अडकलेल्या प्रभाग यामुळे होणारे अपघात यावर उपाययोजना म्हणून प्रभागातील सर्व वीज तारा व खांब काढून भूमिगत केबल टाकल्याने संपूर्ण परिसर धोक्याच्या वीज तारांविरहित व सुरक्षित बनला आहे.





पुण्याईनगर येथील पूर्वस्थिती



पुण्याईनगर येथील सद्यस्थिती








सर्वे नं. २३ /१० बालाजीनगर
मधील पूर्वस्थिती

सर्वे नं. २३ /१० बालाजीनगर
मधील सद्यस्थिती

# सुरक्षित प्रभागासाठी सी.सी.टी.व्ही तैनात

वाढत्या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी महिलांच्या सुरक्षीततेसाठी पुण्याईनगर, काशिनाथ पाटील नगर, बालाजीनगर, राजीव गांधी नगर, बिबवेवाडी या सर्व परिसरातील मुख्य रस्त्यांवर सी.सी.टीव्ही कॅमेरे बसवण्यात आले. या कामाचे उद्घाटन अजितदादा पवार यांच्या हस्ते करण्यात आले. या सी.सी.टी.व्ही कॅमेऱ्याची करडी नजर असल्याने प्रभागातील नागरिकांना सुरक्षित वातावरण लाभले.







प्रभागात बसवण्यात आलेली सीसीटीव्ही






प्रभागातील प्रत्येक रस्त्यांवरील प्रचलित सोडियम व्हेपर पथदिव्यांच्या जागी अत्याधुनिक एल.ई.डी. दिवे बसवून विजेची बचत केली आणि प्रभागातील रस्ते प्रकाशमय केले.

# साफसफाई घरोघरी, विकास दारोदारी

शहराचा कचरा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लावण्यासाठी उभारले सक्षम आधुनिक कचरा निर्मूलन व खत प्रक्रिया प्रकल्प...

सुंदर पुण्याला स्वच्छ बनवण्यासाठी आवश्यक व योग्य ठिकाणी कचऱ्यावर प्रक्रिया करून बायोगॅस प्रकल्प व गांडुळ खत प्रकल्प उभारण्यास प्राधान्य दिले. यामुळे प्रभागाची कचरा समस्या कायम स्वरूपी मार्गी लागली आहे. आपल्या प्रभाग आणि परिसरातील कचरा परिसरातच जिरवता येऊ लागला असून हा प्रकल्प उपयुक्त ठरला आहे.

सततच्या वाढत्या इंधन दरांमुळे रिक्षाचालकांकडून सीएनजी कीटसाठी होणारी वाढती मागणी लक्षात घेऊन रिक्षा व्यवसायांतून उदरनिर्वाह करणाऱ्या मध्यमवर्गीय रिक्षाचालकांसाठी खास योजनेद्वारे धनादेश व सीएनजी कीट परवान्यांचे वाटप केले. ज्याचा पुण्यातील तसेच स्थानिक हजारो रिक्षा व्यावसायिकांनी लाभ घेतला.





कचऱ्याचे विभाजन करण्यासाठी कचरा बकेट वाटप



पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी रिक्षाचालकांना सी.एन.जी. कीट बसवण्यासाठी अनुदान

# बायोगॅस प्रकल्प






गांडूळखत प्रकल्पाचे उद्घाटन करताना
अजितदादा यांच्यासमवेत



गांडूळ खत प्रकल्प



गुरूदत्त सोसायटी जुना रस्ता



जिजामाता चौक ते दुर्गा भवानी माता मंदिर जुना रस्ता



नवलाखा गोडाऊन जुना रस्ता




# प्रभागातील प्रमुख रस्ते लावले मार्गी ...

प्रभागातील रस्ते अरुंद व गैरसोयींचे होते. हे मुख्य रस्ते रुंद करत आधुनिक पद्धतीच्या युटी.डब्ल्यू.टी (सिमेंट काँक्रिट) चा वापरून प्रभागातील सर्व रस्ते व गल्लीबोळ नव्याने केले. यामुळे नागरिकांचा प्रवास सुरळीत आणि सोयीस्कर झाला.

# स्वच्छतेचे संदेश ध्यानी धरू, आरोग्य आपले निरोगी बनवू

महात्मा गांधी जयंतीनिमित्त स्वच्छता सप्ताह अंतर्गत प्रभागातील सर्व भागात स्वच्छता अभियान राबवले. यामध्ये स्वच्छतेविषयी जनजागृती होण्यासाठी पर्यावरण फेरी काढत स्वच्छतेचा संदेश दिला. तसेच नागरिकांना प्रभागाला स्वच्छ व सुंदर करण्यासाठी आवाहन केले.








पर्यावरण फेरी









प्लास्टिक कचरा मुक्त शहर अभियान








# प्रभागातील महिलांचे सक्षमीकरण

महिला भगिनी सक्षम असतील तरच प्रभागाचा सर्वांगीण विकास व उत्कर्ष शक्य आहे. याच भावनेतून दक्षिण पुण्यातील माय भगिनींच्या सक्षमीकरणासाठी आणि आत्मनिर्भरतेसाठी बचतगटाला हॉल उपलब्ध करून देत लघुउद्योगांना प्रोत्साहन दिले. यामध्ये खाद्यपदार्थ बनवणे, शिवण काम, ब्युटी पार्लर, ड्रायव्हिंग यासह विविध प्रशिक्षण कार्यशाळांचे आयोजन केले जाते. या प्रात्यक्षिक उपक्रमामुळे अनेक महिलांना स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध झाली आणि लाडक्या बहिणींनी सक्षमीकरणाच्या मार्गावर पाऊल टाकले. तसेच लहान मुलींसाठी सुकन्या समृद्धी योजनेची नोंदणी करून उपमुख्यमंत्री मा.श्री. अजितदादा पवार यांच्या हस्ते सुकन्या कार्डचे वाटप केले. या सर्व उपक्रमांमुळे प्रभागातील प्रत्येक माता-भगिनी स्वावलंबी व सशक्त होताना दिसत आहे.


जनतेच्या हितासाठी
प्रत्येक पाऊल प्रगतीसाठी













# शिक्षणाने क्रांतिकारी बदल घडवू... मुलांचे भविष्य उज्ज्वल करू

राष्ट्रशक्ती प्रतिष्ठानच्या माध्यमातून दरवर्षी १०,००० विद्यार्थ्यांना मोफत शालेय साहित्याचे वाटप करण्यात येते. गेल्या एका दशकापासून हा उपक्रम राबवण्यात येत आहे. गतवर्षिंच्या अशाच एका उत्स्फूर्त कार्यक्रम प्रसंगी सन्माननीय अजित दादा पवार यांच्या शुभहस्ते शालेय साहित्य व बक्षिसे स्वीकारताना युवक युवती.



## प्रभागात राबवल्या विविध शासकीय शैक्षणिक सहाय्य योजना

मौलाना अबुल कलाम आझाद तसेच अण्णा भाऊ साठे यांसारख्या शैक्षणिक सहाय्य योजनांची आपल्या परिसरात अंमलबजावणी करून अनेक शिक्षणार्थी युवक युवतींना याचा लाभ मिळवून दिला. अशाच एका विद्यार्थ्यांच्या धनादेश वाटप करताना...

आरोग्य दृष्ट्या समाजात दुर्लक्षिल्या जाणाऱ्या एडस्ग्रस्त समाजघटकातील शालेय विद्यार्थी विद्यार्थिनींना शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळावे व यातील कोणतीही मुले मुली शिक्षणापासून वंचित राहू नये या उद्दिष्टातून शालेय साहित्य व संगणकांचे दरवर्षीच जाणीवपूर्वक वितरण करण्यात येते. या प्रसंगी लाभ घेणाऱ्या मुले मलींच्या समवेत ...


जनतेच्या हितासाठी
प्रत्येक पाऊल प्रगतीसाठी
राष्ट्रशक्ती प्रतिष्ठान
व राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी
१०,००० विद्यार्थ्यांना मोफत












# दिवाळीची सुरमय पहाट बनली अधिक सुरैल, अधिक चैतन्यमयी

सुग्रास फराळाचा घमघमाट आणि लाखो लाखो दिव्यांच्या झगमगाटात उगवणारी दिवाळीची सुरम्य पहाट सुरैल व अधिक चैतन्यमयी करण्यासाठी दिवाळी पाडवा पहाट कार्यक्रमाचे दरवर्षी प्रभागात आवर्जुन आयोजन केले जाते.

अशाच यावर्षीच्या चैतन्यदायी आणि सूरमयी दिवाळी पहाट कार्यक्रम प्रसंगी प्रसिद्ध पार्श्वगायिका जुईली जोगळेकर आणि अन्य धुरंधर गायक वृदांनी आपल्या शास्त्रोक्त सूर-संगीतातून दिवाळी शुभेच्छा व्यक्त केल्या. प्रभागात या कार्यक्रमाचे आयोजन २०१६ पासून होत असून दिवाळी पहाट कार्यक्रमात सुप्रसिद्ध पार्श्वगायिका आर्या आंबेकर, सलील कुलकर्णी, उर्मिला धनगर, वैशाली माडे, बेला शेंडे, सावनी रवींद्र, वैशाली सामंत, प्रसन्नजीत कोसंबी, सौरभ दफ्तरदार यांच्यासह अन्य दिग्गज कलाकारांनी सहभाग नोंदवला.


जनतेच्या हितासाठी
प्रत्येक पाऊल प्रगतीसाठी
सर्व नागरिक बंधु-भगिनींना
दीपावलीच्या
जुईली जोगळेकर


दिवाळी पाडवा पहाट
रंगतरंग
सर्व नागरिक बंधु-भगिनींना दिपावलीच्या शुभेच्छा


संवाद पुणे व पायलवृंद निर्मित
स्वरसंगम
सुरेल मराठी हिंदी भावगीतांची मैफल
संयोजन : सुनील महाजन, निकिता


संयोजक : राष्ट्रशक्ती प्रतिष्ठाण,



# नैसर्गिक आपत्तीत दिला निराधारांना आधार

२०१९ मध्ये अतिवृष्टीमुळे आंबील ओढ्याला पूर आल्यामुळे अनेक नागरिकांच्या घरात पुराचे पाणी शिरले. यामुळे नागरिकांना बेघर व्हावे लागले शिवाय अनेकांचे संसार उध्वस्त झाले. नैसर्गिक आपत्तीच्या या काळात नागरिकांच्या मदतीला धाऊन जात त्यांना बालाजीनगर येथील कै. काशिनाथ आनाजी धनकवडे पाटील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये आसरा दिला. त्यांना अन्न धान्याचे वाटप केले. पुराच्या पाण्यात वाहून गेलेल्या घरांचे शासकीय अधिकाऱ्यांसोबत पंचनामे करून घेऊन त्यांना शासनाकडून १५,००० रुपयांची आर्थिक मदत मिळवून दिली. तसेच पुढे अशी परिस्थिती उद्भवू नये म्हणून आंबील ओढ्यावर असणारे दोन पूल पाडून ओढ्यालगत काँक्रीटची रिटेनिंग वॉल उभारली.










जनतेच्या हितासाठी
प्रत्येक पाऊल प्रगतीसाठी













# कोरोनाशी लढताना नागरिकांची काळजी घेताना

कोरोना महामारीच्या संकटात स्वतःच्या जिवाची पर्वा न करता नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी आणि कोरोना विषाणूचा वाढता प्रादुर्भाव रोखण्याकरता संपूर्ण प्रभागात औषध फवारणी केली. तसेच प्रभागातील नागरिकांचे स्वॅब टेस्टिंग करून घेतले. प्रभागातील प्रत्येक कुटुंबातील व्यक्तींचे कै. काशिनाथ आनाजी धनकवडे पाटील प्राथमिक आरोग्य केंद्रात लसीकरण करून घेतले. तसेच आवश्यकतेनुसार नागरिकांना मोफत औषध दिली.

माझ्या प्रयत्नातून बालाजीनगर, वारकरी भवन, पुण्याईनगर येथील आरोग्य कोठी, राजीव गांधी नगर मधील उद्यानाशेजारील पार्किंग तसेच चैत्रबन येथील बौद्ध विहार, दुर्गामाता मंदिर शेजारी नागरिकांची कोरोनाची स्वॅब टेस्टिंग करण्यासाठी कॅम्प उभारले आणि ५०,६११ नागरिकांचे लसीकरण करून घेतले.

कोरोना महामारीच्या संकटात दररोज कर्तव्य समजून कचरा संकलनाचे काम करणाऱ्या कचरा सफाई कर्मचाऱ्यांना त्यांच्या आरोग्याची काळजी घेता घ्यावी याकरता 'स्वच्छ संस्थे' मार्फत मास्क, स्कार्फ, सॅनिटायझर, हॅन्ड ग्लोजचे वाटप केले. शिवाय आर्थिक दृष्ट्या असक्षम असलेल्या अनेक नागरिकांना मदतीचा एक हात देत अन्नधान्याच्या किट्सचे वाटप केले. तसेच कोरोना काळात सेवा करणारे हॉस्पिटलमधील डॉक्टर्स, नर्सेस आणि कर्मचारी यांना 'कोरोना नायक' म्हणून सन्मानपत्र देऊन सन्मानित केले.

## कोरोना काळात व्हॅक्सिनेशन केलेल्या नागरिकांची आकडेवारी

- कार्बो व्हॅक्सिन = ५१८
- कोविशील्ड वैक्सीन = २६८१३
- कोवॅक्सिंन = २३२८०








जनतेच्या हितासाठी
प्रत्येक पाऊल प्रगतीसाठी
HOSPITAL




पुणे महानगरपालिका
कोविड-१९









श्री.दत्तात्रय धनकवडे
जनसंपर्क कार्यालय





# बालाजीनगर मेट्रो स्टेशन





कार्यालय : ०२०-२४३७०८८९
मोबाईल : ९४२२०३५३७८
कार्यालय : स.नं. २१, धनश्री, पुणे-सातारा रोड, धनकवडी, पुणे - ४११ ०४३

3/3

दत्तात्रय बबनराव धनकवडे
मा. महापौर, पुणे
मा.सभासद, पुणे मनपा

दिनांक : / / २०

दि. ३१/०७/२०२४

प्रति,
मा. ना. अजितदादा पवार
उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य,
मुंबई.

यांसी.....

सप्रेम नमस्कार,

विषय :- स्वारगेट ते कात्रज दरम्यानच्या भुयारी मेट्रो मार्गावर शंकर महाराज मठ, धनकवडी येथे मेट्रो स्टेशन उभारणे बाबत.

महोदय,

स्वारगेट ते कात्रज या भुयारी मेट्रो मार्गाच्या कामास मान्यता मिळाली आहे व कामास सुरुवात झालेली आहे. सदर मार्गावर स्वारगेट, मार्केट यार्ड, पद्मावती व कात्रज येथे स्टेशन दर्शविली आहेत. परंतु धनकवडी येथे मेट्रो स्टेशन दर्शविलेले नाही. धनकवडी व बिबवेवाडी परिसर अत्यंत दाट लोकवस्तीचा असुन सदर धनकवडी येथील स्टेशनचा लाभ धनकवडी व बिबवेवाडी परिसरातील नागरिकांना होणार आहे. तरी धनकवडी येथे मेट्रो स्टेशन करण्यात यावे, हि विनंती.

कळावे,

आपला स्नेहांकित

दत्तात्रय धनकवडे

प्रत
१) मा. श्री. श्रवण हर्डीकर,
मॅनेजिंग डायरेक्टर






# चाहूल मेट्रो सिटीची...

दक्षिण पुण्यातील बालाजीनगर, धनकवडी, बिबवेवाडी हा दोन ते अडीच लाख लोकसंख्या असलेला भाग आहे. या भागाच्या सार्वजनिक वाहतुकीसाठी नवसंजीवनी ठरणाऱ्या स्वारगेट ते कात्रज मेट्रो मार्गावर बालाजीनगर येथे मेट्रो स्टेशन व्हावे यासाठी मी ३१ जुलै २०२४ ला उपमुख्यमंत्री मा. अजितदादा पवार यांना निवेदन पत्र दिले होते.

मा. अजितदादांनी पुढाकार घेऊन स्वारगेट ते कात्रज मेट्रो मार्गावर बालाजीनगर येथे मेट्रो स्टेशन उभारण्यास राज्य शासनाची मान्यता मिळवून दिली. बालाजीनगर मेट्रो स्टेशनमुळे निश्चितच परिसरातील नागरिकांचा सार्वजनिक वाहतुकीचा प्रश्न कायमस्वरूपी सुटणार आहे.



# विकासकामांच्या भूमिपूजन आणि लोकार्पणातून समृध्द झाला प्रभाग...

**भुमिपूजने...**

शुभारंभातून जागोजागी प्रत्यक्ष कार्यारंभ  बालाजीनगर, काशिनाथ पाटीलनगर, राजीव गांधी नगर, सुख सागर नगर, पुण्याईनगर, व परिसरातील वीज, पाणी, रस्ते, ड्रेनेज तसेच विविध विकासकामे युद्ध पातळीवर कार्यान्वियीत केली. विविध भुमिपुजन कार्यक्रमप्रसंगी नागरिकांच्या समवेत


जनतेच्या हितासाठी
प्रत्येक पाऊल प्रगतीसाठी

















प्रभागाचा संपूर्ण विकास करताना सुसज्ज अशा रस्त्यांचे जाळे निर्माण केले. प्रभागातील संपूर्ण अंतर्गत रस्ते हे UTWT टेक्नॉलॉजी वापरून तयार केल्यामुळे आजही हे रस्ते खड्डेमुक्त आणि दर्जेदार आहेत. शिवाय प्रमुख रस्त्यांचे सीमेंट क्रॉंक्रिन्टमध्ये रुपांतर केल्यानंतर त्यावर रात्रीचे अपघात टाळण्यासाठी स्ट्रीट लाईट व cat- light बसवत थर्मो प्लास्टिक पेंट केले.














# वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे

प्रभागात विविध ठिकाणी वृक्षारोपण करून हरित उपक्रम यशस्वीरित्या राबविला. यामुळे नागरिकांना स्वच्छ व शुद्ध हवा मिळाली आणि आपला परिसर अधिक सुंदर आणि आरोग्यदायी बनेल.



# महापौर काळ

## सूज्ञ सुजाण पुणेकर नागरिकांचा प्रथम नागरिक म्हणून नेतृत्व करण्याचे लाभले भाग्य...

### महापौरपदाचा प्रत्येक क्षण लावला सत्कारणी

ऐतिहासिक पुनवडीचे पुणे महानगर झाले. पुणे महानगरपालिकेचे ५३ वे महापौरपद सांभाळताना पुणे शहराची प्रगतीच्या दिशेने वाटचाल करताना स्मार्ट सिटीची मुहूर्तमेढ रोवण्याची ऐतिहासिक संधी लाभली. तसेच विस्तारणाऱ्या शहरासोबत कराव्या लागणाऱ्या पायाभुत सुविधा. पाणी, कचरा, आरोग्य यांचे सुयोग्य व्यवस्थापन आणि सामाजिक एकोपा राखत देशातील अग्रगण्य शहराच्या दिशेने वाटचाल करण्यासाठी

**आदरणीय शरदचंद्र पवार साहेब**
**मा. अजितदादा पवार**

यांच्या मार्गदर्शनाने महापौरपदाचा प्रत्येक क्षण सत्कारणी लावल्याचे निश्चितच समाधान आहे.

पुण्यनगरीचे महापौरपद हे कुठल्याही राजकिय कार्यकर्त्यांच्या कारकिर्दीतील मानाचा शिरपेच. जाणिवांच्या या शहरात तथाकथित मानपान आणि शुभारंभांचे नारळ वाढविण्याइतके संकुचित व शोभेचे तर निश्चितच नाही. जागरूक पुणेकर कायमच शहराचे व्यवस्थापन करणाऱ्या महानगरपालिकेवर लक्ष ठेऊन असतात. शहराच्या सुनियोजीत वाटचालीमध्ये नागरिकांचा सहभाग हा कायमच महत्वाचा ठरला आहे. त्यामुळे महापौरपद सांभाळताना केवळ शहरहित डोळ्यासमोर ठेवून निर्णय आणि दैनंदिन व्यवस्थापन करत असताना शहराच्या भविष्याचा वेध घेणे, हे निश्चितच आव्हान आहे. या निर्णायक जबाबदारीचे शिवधनुष्य पेलताना कुठल्याही राजकिय पक्षापेक्षा पुणेकरांचा प्रतिनिधी म्हणून सर्वांना सोबत घेऊन शहराची उज्वल भविष्याकडे वाटचाल करण्याचा मी प्रयत्न केला. किंबहुना पुण्यनगरीचे पुनवडी ते पुणे आणि पुढे स्मार्ट पुण्याची मुहूर्तमेढ रोवण्याची एतिहासिक सुवर्णसंधी मला लाभली. तमाम पुणेकरांचे भक्कम पाठबळ, सर्व राजकिय पक्षांचा पाठिंबा, प्रशासनाची खंबीर साथ यामुळेच अवघ्या दोन वर्षाच्या कालावधीत पुणेकरांची सेवा करणे शक्य झाले. हे आवर्जून नमूद करावेसे वाटते.

# चाहूल मेट्रो सिटीची...

पुणे शहरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम झाली पाहिजे त्यासाठी मेट्रो प्रकल्पाला मान्यता मिळाली पाहिजे, मेट्रोचे जाळे विस्तारने हा एकच उपाय होता. केंद्र सरकारच्या स्तरावर प्रलंबित असणारा पुणे मेट्रोचा प्रश्न निकाली निघाला पाहिजे यासाठी मी महापौर असताना तत्कालीन नगरविकास मंत्री स्व. व्यंकय्या नायडू साहेब यांची भेट...



पुणे मेट्रोला लवकरात लवकर मान्यता मिळावी यासाठी राजधानी दिल्ली येथे तत्कालीन नगरविकास मंत्री स्व. व्यंकय्या नायडू साहेब यांची आदरणीय शरदचंद्र पवार साहेब आणि मा. अजितदादा पवार यांच्यासमवेत भेट घेतली. या भेटीमध्ये त्यांना पुणेकरांच्यावतीने निवेदन दिले व मेट्रो प्रकल्पाला लवकरात लवकर मान्यता देण्याची विनंती केली.




पुणे मेट्रोच्या मान्यतेसाठी दिल्ली येथे संबंधित खात्याचे केंद्रीय मंत्री, सर्वपक्षीय खासदार व राज्यातील मंत्री मोहोदयांच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीला मा. अजितदादा यांच्यासमवेत उपस्थित राहून पुणेकरांचे प्रतिनिधित्व केले. सर्व पक्षीय बैठक प्रसंगी आदरणीय शरदचंद्र पवारसाहेब, मा. नितीन गडकरी साहेब, तत्कालीन पालकमंत्री स्व. गिरीश बापट साहेब, उपमुख्यमंत्री मा. अजितदादा पवार, मा. एकनाथजी शिंदे यांच्यासमवेत



मुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस यांच्याकडे कचरा डम्पिंग ग्राउंडसाठी जागा मिळावी तसेच पुणे शहराचे राज्यशासनाकडील प्रलंबित प्रश्न तातडीने मार्गी लावावेत अशी मागणी करताना...




प्रभागात ई लर्निंग स्कूलच्या पायाभरणी समारंभात उपमुख्यमंत्री
मा.श्री. अजितदादा पवार यांच्यासमवेत



पुणे दौऱ्याप्रसंगी मा. पंतप्रधान नरेंद्र मोदींचे विमानतळावर स्वागत करताना,
तत्कालीन पालकमंत्री, स्व. गिरीश बापट साहेब, तत्कालीन जिल्हाधिकारी सौरभराव यांच्यासमवेत



पुणे दौऱ्याप्रसंगी तत्कालीन महामहीम राष्ट्रपती प्रणवजी मुखर्जी यांचे विमानतळावर स्वागत
करताना, तत्कालीन राज्यपाल विद्यासागर राव, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमवेत








# परदेशी गुंतवणुकीला चालना

पुणे शहर एक राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावर नावलौकिक असणारे शहर, कला, क्रीडा, सांस्कृतिक आणि शैक्षणिक क्षेत्रात जेवढे, तेवढेच औद्योगिक क्षेत्रात अग्रेसर. मुंबई पाठोपाठ मोठी असणारी महापालिका. या सर्व वैभवाशाली परंपरेला साजेसी राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावरसुरू असणारी देवाण घेवाण, उद्योग व्यवसायासाठी सर्वांगीणदृष्ट्या पूरक आणि पोषक वातावरणात गुंतवणूकीसाठी नेहमीच उत्सुक व इच्छूक असणाऱ्या परदेशी कंपन्या जर्मनी, कोलेस्टर,आयर्लंड, फिनलॅन्ड, नॉर्वे, चीन (शांघाय), ऑस्ट्रेलिया, इस्त्राईल देशांच्या शिष्टमंडळांचे स्वागत केले. त्यामध्ये शहराच्या आधुनिक सेवांपासून औद्योगिक गुंतवणूकीपर्यंतच्या प्रस्तावांवर चर्चा झाली. आपल्या कृतीशिल प्रयत्न व सततच्या पाठपुराव्यातून यशस्वीकरण्याचा प्रयत्न केला.







# नदी सुधार प्रकल्प

शहरात खडकवासला धरणापासुनच अगदी मुंढवा गावापर्यंत मुठा नदीचे पात्र सुमारे २१ कि.मी. आहे. नदीच्या दुतर्फा वाढणाऱ्या लोकवस्तीमुळे नदी मोठ्या प्रमाणावर प्रदूषित होत आहे. पर्यावरणीय दृष्ट्या आणि सौंदर्याच्या हेतूने नदी सुधारणेचा महत्त्वपूर्ण प्रकल्प महापालिकेच्या वतीने हाती घेण्यात आला आहे. यासाठी मोठ्या प्रमाणात निधीची आवश्यकता होती.

महापालिकेच्या उत्पादनाच्या तुलनेने खर्चाचे प्रमाण खुपच अधिक असल्याने या योजनेसाठी केंद्र आणि राज्य शासनाकडून निधी मिळावा यासाठी आदरणीय शरदचंद्र पवार साहेब मा. अजितदादा पवार यांनी २०१२ पासून केंद्र शासनाकडे पाठपुरावा केला आहे. या कामासाठी निधी उपलब्ध व्हावा, म्हणून माझ्या महापौर पदाच्या कार्यकाळात सातत्याने केंद्र आणि राज्य शासनाचे प्रमुख पदाधिकारी आणि अधिकाऱ्यांबरोबर पत्रव्यवहार केला. नदी सुधार योजनेसाठी जपानच्या जायका या कंपनीने केंद्र शासनाला तब्बल ९७० कोटी रुपये अर्थसहाय्य केले. केंद्र सरकारच्या माध्यमातून हा निधी महापालिकेला मिळण्यासाठी प्रयत्न केले. नदीसुधार कार्यक्रमा अंतर्गत नदी काठावर मैलापाणी प्रक्रिया प्रकल्प उभारले जाऊन नदीच्या सुशोभिकरणाच्या प्रत्यक्ष कामासही सुरुवात होईल.









# मुंढवा मैलापाणी प्रक्रिया प्रकल्प (मुंढवा जॅकवेल)

शहरात मोठ्या प्रमाणावर निर्माण होणारे मैलापाणी काही अंशी प्रक्रिया करून मुठा नदीत सोडले जाते. यामुळे नदीचे पाणी तर दुषित होतच असून पुढे उजनी जलाशय प्रदुषित होते. वाढत्या शहराची पिण्याच्या पाण्याची गरज भागविण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने नदीत सोडले जाणारे मैलापाणी प्रक्रिया करून बेबी कॅनॉलद्वारे शेतीसाठी उपलब्ध करून देण्याची अट घातली आहे. मा. अजितदादा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिकेने मुंढवा येथे नदीकाठावर ६ टीएमसी मैलापाण्यावर प्रक्रिया करण्याच्या प्रकल्पाचे काम हाती घेतले. महापौरपदाच्या कारकिर्दीत हा प्रकल्प गतीने पूर्णकरण्यासाठी विशेष पाठपुरावा केला. हा प्रकल्प कार्यन्वीतही झाला. त्यामुळे ऐन दुष्काळी परिस्थितीत शेतीला पाणी तर उपलब्ध झालेच त्याचवेळी या प्रकल्पामुळे उजनी जलाशयाकडे जाणाऱ्या मैलापाण्याचे प्रमाणही कमी झाले. यामुळे निश्चितच येत्या काही काळात पुणे शहरासाठी धरणातून अतिरिक्त पाणी मिळण्यास मदत होणार आहे. प्रकल्प उद्घाटन प्रसंगी मा. अजितदादा पवार तत्कालीन पालकमंत्री स्व. गिरीष जी बापट, सौ. अश्विनी कदम, मा. महापौर स्व. चंचला कोद्रे, मा. उपमहापौर बंडु गायकवाड, उपमहापौर आबा बागुल यांच्यासमवेत



पुणे शहराचा सांस्कृतिक, ऐतिहासिक, सामाजिक आणि शैक्षणिक वारसा जागतिक पटलावर आला पाहिजे हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून पुणे शहराच्या कॉफी टेबल बुकची निर्मिती केली.
या कॉफीटेबल बुकचे अनावरण करताना
आदरणीय शरदचंद्र पवारसाहेब, तत्कालीन पालक मंत्री स्व. गिरीष बाबट साहेब
तत्कालीन आयुक्त कुणाल कुमार, आबा बागुल, वंदनाताई चव्हाण यांच्यासमवेत





पुणेदर्शन नवीन बसचे अनावरण करताना...

# पर्यटन व्यवसायाला चालना....

राज्य पर्यटन महामंडळ व पर्यटन क्षेत्रातील तज्ञांची मदत घेऊन पर्यटनाला चालना देण्यासाठी परदेशांच्या धर्तीवर कॉफी टेबल बुक ही संकल्पना अंमलात आणली. शहरात येणाऱ्या पर्यटकांना पर्यटनासाठी सुलभ सेवा देण्यासाठी पुणे दर्शन बसेसच्या ताफ्यात अद्ययावत तंत्रज्ञान आणि सोयींनी सज्ज दोन नवीन बसेस उपलब्ध करून देण्यात आल्या. या बसेसचा शुभारंभ आरदणीय नेते शरदचंद्र पवार साहेब आणि तत्कालीन पालकमंत्री स्व. गिरीश बापट साहेब यांच्या उपस्थितीत करण्यात आला.




ई न्यूज लेटर, इंस्टाग्राम, फेसबुक या विशेष सेवासुविधा प्रणालीचा शुभारंभ माझ्याहस्ते करण्यात आला. या प्रसंगी शंकट केमसे, आबा बागुल, आयुक्त कुणाल कुमार, अरविंद शिंदे, गणेश बिडकर यांच्या समवेत






## महापालिकेतील तक्रारींसाठी सोशल मिडीयाद्वारे ऑनलाईन तक्रार प्रणालीची सेवा सुविधा...

पुणे महानगरपालिकेतील कामकाज व कामांसंदर्भातील तक्रारी नागरिकांना ऑनलाईन करता याव्यात यासाठी सोशल मिडीयाद्वारा (ई-न्यूज लेटर, इन्स्टाग्राम, फेसबुक) विशेष सेवा सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. या प्रणालीच्या शुभारंभ प्रसंगी उपस्थित पदाधिकारी व नगरसेवकांसमवेत




शहरात डेंग्यू, चिकनगुनिया सारख्या साथीच्या रोगांवर नियंत्रण व
जनजागृतीसाठी रॅलीचे आयोजन...





डेंग्यू, मलेरिया, चिकनगुनिया सारख्या साथीच्या रोगांचा फैलाव लक्षात घेऊन
महानगरपालिकेच्या आरोग्यखाते तसेच सेवाभावी आरोग्य संस्था डॉक्टर्स व
इतर मान्यवरांच्या उपस्थितीत शहर पातळीवर जनजागरण अभियान राबविले.
यामध्ये कमलताई ढोले पाटील, कमलताई व्यवहारे, रुपालीताई ठोंबरे,
आबा बागुल, आयुक्त कुणाल कुमार यांच्यासमवेत




बी.आर.टी प्रवास सेवांतर्गत पीएमपीएल नवीन बसेस् सह नवीन बसमार्गाचा शुभारंभ







पुणे शहरातील महत्वाकांक्षी अशा बीआरटी प्रकल्पा अंतर्गत संगमवाडी ते विश्रांतवाडी या बीआरटी प्रकल्पास माझ्या कारकिर्दीत अधिक गतिमान केले. नवीन बसेस् सह नवीन बसमार्गांना हिरवा झेंडा दाखवताना सन्माननीय अजितदादा पवार, विश्वजित कदम, अरविंद शिंदे, मुकारी अलगुडे व इतर मान्यवरांसमवेत






महात्मा फुले मंडई


बंडगार्डन आर्टप्लाझा


शनिवार वाडा




# पुरातन वास्तुंचे जतन, सौंदर्य आणि देखभालीसाठी उचलली ठोस पाऊले...

सांस्कृतिक पुण्यनगरीला लाभलेला ऐतिहासिक पौराणिक वारसा, पर्यटनाचा ठेवा... जो भावी पिढीसाठी आदर्श, प्रेरणा आणि स्फुर्तीचा उर्जा-स्त्रोत आहे. तो निरंतर आहे व तसा किंवा अधिक सुंदर व्हावा, यासाठी याच महापौर कारकिर्दीत पुण्यातील शनिवार वाडा, नाना वाडा, विश्रामबाग वाडा, महात्मा फुले मंडई, बंडगार्डन आर्टप्लाझा आदि स्थळांना भक्कम व सुशोभित करताना स्लाईड शो, रोषणाई तसेच आर.जी.बी. कलर चेंजर्स सारख्या सुविधा आहेत. याचे लोकार्पण करताना तत्कालीन म्हाडा अध्यक्ष अंकुश काकडे, बंडू केमसे, दिलीप काळोखे, आबा बागुल, आण्णा थोरात, अशोक येनपुरे यांच्या समवेत




राष्ट्रीय सण-उत्सव, स्वातंत्र्य दिन, प्रजासत्ताक दिन आगळ्या वेगळ्या उत्साहात केले साजरे...

स्वातंत्र्य दिन व प्रजासत्ताक
दिनानिमित्त महापालिका सुरक्षा
अधिकारी आयोजित संचलनात
मान वंदना घेण्याचा व ध्वजवंदनाचा
सन्मान प्रथम नागरीक या नात्याने
मिळाला. देशाभिमानाच्या
बहुमानाचा हा अविस्मरणीय
असाच क्षण होता.





















पुण्याच्या सर्वांगीण विकासातील अमुल्य सहभागा बद्दल
नागरीक व अधिकाऱ्याचा सन्मान करताना..

१५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिन तसेच २६ जानेवारी प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात पुण्याच्या विकासात भर घालणारे नागरिक, खेळाडू, कलावंत व प्रशासकीय अधिकाऱ्यांचा सन्मान करताना.

# अभिवादन महापुरूषांच्या विचारांना

















**महानगरपालिकेच्या पारंपारिक शिवजयंती उत्सवा प्रसंगी अश्वारुढ छत्रपती शिवाजीमहाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करताना.**




# पुण्यनगरीची पुण्याई... संत ज्ञानेश्वर महाराज व तुकाराम महाराज पालखी सोहळ्याची नवलाई,

**रमले महापौर भजन-किर्तनी...**

जगाचे लक्ष वेधून घेणाऱ्या लाखो वारकऱ्यांचा हा मेळा म्हणजे दरवर्षी येणारा आपला पालखी सोहळा, पुण्याच्या वेशीवर येतो. लाखो पुणेकर मिळून संत ज्ञानेश्वर महाराज व संत तुकाराम महाराजांचे दर्शन व वारकरी समुदायाचे भक्तिपूर्ण स्वागत करण्यासाठी एकत्र येतात आणि भजन किर्तनाच्या भक्तीसागरात रमून जातात...










## पुण्यनगरीचे आराध्य दैवत श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मिरवणुक रथाच्या सारथ्याची बहुमान...

जगात नावाजलेला पुण्याचा पारंपरिक गणेशोत्सव आणि पुणेकर गणेश भक्तांचे आराध्य दैवत असणारे मानाचा कसबा गणपती सार्वजनिक गणेशोत्सव विसर्जन मिरवणूकांचा प्रारंभ व सहभागी मंडळाचे स्वागत करण्यचा सन्मान महापौर या नात्याने मिळाला.





पुण्यनगरीच्या गणपती विसर्जन मिरवणुक आणि मानाच्या पहिल्या कसबा गणपतीच्या विसर्जन मिरवणूकीस प्रारंभ करताना...

पर्यावरण प्रेमींच्या मागणीला दुजोरा देत आणि मंडळांना विश्वासात घेत, कोणत्याही प्रदूषणाशिवाय पुण्यातील मानाच्या गणपतींचे तसेच सर्व सार्वजनिक मंडळांच्या गणपतींचे विसर्जन हौदात करण्याचा सार्थ निर्णय

# क्रीडा नगरी... पुण्यनगरीची एक सार्थ ओळख

कला-सांस्कृतिक-शैक्षणिक नगरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुण्यनगरीची आणखी एक सार्थ ओळख म्हणजे क्रीडा नगरी...ज्यामध्ये महापालिकेच्या वतीने प्रत्येक वर्षी घेण्यात येणाऱ्या राज्यपातळीवरील क्रीडा स्पर्धांची सर्वच खेळातील खेळाडू जणू प्रतिक्षेतच असतात, महापौर चषक क्रीडा स्पर्धा बॅनरखाली संपन्न होणाऱ्या या स्पर्धांना आपल्या महापौर कारकिर्दीत अधिक व्यापक स्वरूप प्राप्त करून दिले आहे. ज्यासाठी महाराष्ट्र तसेच पुण्यातील राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय क्रीडा महर्षिंचे मार्गदर्शन व छत्रपती अ‍ॅवॉर्ड प्राप्त नामांकित खेळाडूंचे सक्रिय सहकार्य घेऊन या स्पर्धा यशस्वीरित्या पार पाडल्या...

अर्थातच यामागे क्रीडा रसिक आदरणीय शरद पवार साहेबांपासून सन्माननीय अजितदादा यांचा महत्वपूर्ण सहयोग आणि सहभाग होता.








जनतेच्या हितासाठी
प्रत्येक पाऊल प्रगतीसाठी











# कला मोहोत्सावातून जपली पुण्यासह महाराष्ट्राची गौरवशाली संस्कृती आणि परंपरा....













जनतेच्या हितासाठी
प्रत्येक पाऊल प्रगतीसाठी
jatan
pune youth festival
FEB 13 - 15 2016
शनिवार, दिनांक १३ फेब्रुवारी २०१६ ते सोमवार, दिनांक १५ फेब्रुवारी २०१६




jatan
pune youth festival
पुणे महानगरपालिका




jatan
पुणे महानगरपालिका
Sunday 14th February 2016
Battle of Bands &
Dress to Impress


सांस्कृतिक महोत्सव




# सर्वस्पर्शी कार्याला भावस्पर्शी भक्तिकार्याची जोड

**परिसरातील वातावरण पवित्र झाले की मनही प्रसन्न आणि भक्तिमय होतं...**

याचं श्रध्दा आणि सबूरीतून परिसरातील भाविक भक्त व नागरिकांसाठी काशिनाथ पाटील नगरातील श्री साई-विठ्ठल मंदिराच्या जिर्णोध्दारातून विस्तारित आणि सुशोभित नुतनीकरणाचा सोनेरी कळस चढवला आहे. कलशारोहण कार्यक्रम प्रसंगी जगद्‌गुरू श्री. शंकराचार्य व भाविक महिला-भगिनी, ज्येष्ठ नागरिक व सहकारी कार्यकर्त्यासमवेत. सालाबादप्रमाणे दरवर्षी याठिकाणी काकड आरती आणि कीर्तन काला व महाप्रसादाचे आयोजन भक्तांसाठी केले जाते.

# बालाजी मंदिर











आपल्या प्रभागातील बालाजीनगर येथील पवार हॉस्पिटल चौकात
स्थित श्री बालाजी मंदिराचा जीर्णोद्धार करून कलशारोहण सोहळा २२ मे २०२२ रोजी संपन्न झाला.
याच दिवशी बालाजी मूर्तीसह संत सेना महाराज आणि संत ज्ञानेश्वर महाराजांच्या
मूर्तींची प्राणप्रतिष्ठापना सर्व बालाजीनगरवासीयांच्या सहभागातून विधीवत पार पडली.

दरवर्षी २२ मे रोजी बालाजीनगरवासीयांच्या उपस्थितीत मंदिराचा वर्धापन दिन भक्तिमय
वातावरणात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करून साजरा केला जातो.
तसेच महापूजेचे व महाप्रसादाचे लोकसहभागातून भक्तांसाठी आयोजन केले जाते.












मुस्लिम बांधवांसोबत ईद साजरी करताना


जनतेच्या हितासाठी
प्रत्येक पाऊल प्रगतीसाठी
सुज्ञ सुजाण पुणेकरांच्या प्रथम
नागरिकत्वाचा मिळाला बहुमान
आणि आनंदाला आले उधाण

# दखल माध्यमांची



प्रतिष्ठानतर्फे दप्तर, वह्यांचे वाटप
जीनगरचे नाला गार्डन
पुढारी
पुणे, गुरुवार, ४ सप्टेंबर २०२५
बालाजीनगर मेट्रो स्टेशनला मंजुरी मिळाल्याने समाधान
माजी महापौर दत्तात्रय धनकवडे यांच्या पाठपुराव्याला यश
पुण्याचा विकास अनेक कारणां
धनकवडी महोत्सव उत्साहात
शरद पवार यांच्या वाढ
धनकवडीत रक्तगट त
महिलांसाठी नवीन बस सुरू
गुड मॉर्निंग
प्रभात
पुणे, सोमवार, दि. १४ मार्च २०२२
स्व. माणिकचंद नारायणदास दुगड हॉस्पिटलचे लोकार्पण
प्रभात
शुक्रवार, दि. ५ सप्टेंबर २०२५
बालाजीनगर मेट्रो स्टेशनसाठी धनकवडे यांच्या पाठपुराव्याला यश
महानगरपालि
नागरी समस्या सोडविण्यासाठी 'राष्ट्रवादी'चे लाक्षणिक उपोषण
कैद्यांच्या मुलांसाठी मदतीचा हात
पुढारी
११ सप्टेंबर २००८
मनपा सांस्कृतिक वारसा जपत आहे : कोंडविलकर
लोकशाही बळकट होईल
प्रभात
पुणे, गुरुवार, दि. ४ सप्टेंबर २०२५
स्वारगेट-कात्रज मेट्रोला ग्रीन सिग्नल
दक्षिण पुण्याच्या सार्वजनिक वाहतुकीला मिळणार गती
साईबहार प्रमुख आकर्षण
अनेक मान्यवरांची उपस्थिती
सातारा रस्त्यावरील उड्डाण
पूर्ण झाल्यावरच
पालकमंत्र्यांनी दिला मु
ची विकासकामे सुरू



जनतेच्या हितासाठी
प्रत्येक पाऊल प्रगतीसाठी
मेट्रोच्या विस्तारास मिळणार गती
बिबवेवाडी, बालाजीनगर या नवीन स्थानकांची होणार उभारणी
'राष्ट्रवादी'चा रास्ता रोको
गांडूळ प्रकल्प राबवू ओला कचरा हटवू...
आमदार शिवरकरांसह २०० जणांना अटक करून सोडले
धनकवडी उड्डाणपुलाला उशीर; ठेकेदाराला १५ लाखांचा दंड
वाहतूक कोंडीमुळे नागरिक त्रस्त
उड्डाणपुलामुळे वाहतूक कोंडीतून होणार सुटका
धनकवडीत पर्यावरण जागृती फेरी उत्साहात
धनकवडीत गॅसचा तुटवडा
सुरळीत वाहतुकीसाठी सातारा रस्त्यावर उड्डाणपूल
सात दिवसांत अहवाल द्या
प्रतिबिंब
सातारा रस्त्यावर साकारणार उड्डाणपूल
कात्रज-आंबेगावातील विद्युतवाहिन्या सहा महिन्यांत भूमिगत होणार

# ...कृतज्ञता...

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि पक्षश्रेष्ठींसह, शहर तसेच स्थानिक पातळीवरील पदाधिकारी, सहकारी कार्यकर्ते आणि विविध कार्यक्षेत्रातील, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक तसेच क्रीडा संस्था, सार्वजनिक मंडळे, पत्रकार, अधिकारी वर्ग मित्रपरिवार व अनेकांनी व्यक्तिशः मला प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष बहुमोलाचे सहकार्य केले आहे. त्यामुळेच तिन्ही निवडणूकांत आपण विजय प्राप्त करु शकलो आहोत या प्रामाणिक जाणीवेतून मी या कार्यअहवालातून कृतज्ञता व्यक्त करु इच्छितो. सर्वात महत्वाचे म्हणजे ज्या माझ्या मतदार बांधवांनी, लाडक्या माय भगिनींनी माझ्यावर विश्वास व्यक्त केला, त्यांच्या शक्य त्या सर्व अपेक्षा पूर्ण करण्याचा मी सर्वतोपरिने प्रामाणिक प्रयत्न केला आहे. मी आपणा सर्वांच्याच कायम ऋणात राहू इच्छितो आपल्या सहकार्याची अपेक्षा करतो, विनंती करतो....

धन्यवाद

अधिक माहितीसाठी
QR कोड स्कॅन करा




— जनसंपर्क कार्यालय —

धनश्री बिल्डींग, स.नं. 20, पुणे सातारा रोड,
ॲक्सिस बँकशेजारी, बालाजीनगर, धनकवडी, पुणे 43.
फोन नं : 020-24370889 मो.: 9689935714

**दत्तात्रय बबनराव धनकवडे**
मा. महापौर व नगरसेवक पुणे म. न. पा.
सरचिटणीस, महाराष्ट्र राज्य रा. काँ. पार्टी
https://dattatraydhankawade.in
dhankawade.dattatraya  DDhankawade